अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051.
फोन व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठकीचे इतिवृत्त.

जा.क्र.उप.व/कांकमुं/इतिवृत्त/ 45 /२०१७-१८
वांद्रे.५१, दिनांक :- 15 /०९/२०१७

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी. संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची ७ वी बैठक दि. 22/06/2017 रोजी मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे जुने सचिवालय, फोर्ट मुंबई येथील कार्यालय येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजुर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची 7 वी मासिक बैठक.**

**दिनांक 22.06.2017**

**स्थळ :- विभागीय आयुक्त कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई.**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि. 22.06.2017 रोजी कोकण विभागातील वेटलॅड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ति उपस्थित होत्या.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. जगदीश पाटील | विभागीय आयुक्त, कोकण भवन, नवी मुंबई. | विभागीय आयुक्त |
| 2 | श्री. प्रशांत नारनवरे | जिल्हाधिकारी पालघर | जिल्हाधिकारी पालघर |
| 3 | श्री. जयरामेगौडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई. | उपवनसंरक्षक, कांद्रळवन कक्ष मुंबई. |
| 4 | श्री. सतिश देशमुख | जिल्हाधिकारी पालघर | अपर जिल्हाधिकारी पालघर |
| 5 | श्री. दिपक क्षीरसागर | जिल्हाधिकारी पालघर | उपविभागीय अधिकारी, (वसई) |
| 6 | श्री. एम. बी. सावंत. | जिल्हाधिकारी रत्नागिरी | प्रतिनिधी, जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| 7 | श्री. डी.एस.चाबुकस्वार | नवी मुंबई महानगरपालिका | उपआयुक्त |
| 8 | सौ. सुवर्णा प्रसाद पत्की | पोलिस अधिक्षक कार्यालय, रत्नागिरी | पोलिस निरीक्षक, सुरक्षा शाखा रत्नागिरी. |
| 9 | श्री. शिवाजी बाळु कोळी | पोलिस अधिक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग | पोलिस निरीक्षक, सागरी सुरक्षा शाखा, सिंधुदुर्ग. |
| 10 | श्री. नामदेव वि. बंडगर | पोलिस अधिक्षक कार्यालय, रायगड | पोलिस निरीक्षक, सुरक्षा विभाग रायगड |
| 11 | श्री. स्टॅलिन डी. | संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था. | संचालक |
| 12 | श्रीमती. मेघना बुरांडे | पोलिस अधिक्षक कार्यालय, रायगड | प्रतिनिधी, सहाय्यक पोलिस निरीक्षक, रायगड |
| 13 | श्री. दत्तु पांडुरंग भोये. | पोलिस अधिक्षक कार्यालय, पालघर | प्रतिनिधी, पोलिस निरीक्षक. |
| 14 | श्री. एस. ए.अन्सारी | बृहन्मुंबई महानगरपालिका | प्रमुख अभियंता |
| 15 | श्री. दिपक पुजारी | मिरा भाईंदर महानगरपालिका | उपआयुक्त |
| 16 | श्री. पांडुरंग बि. बंडगर | बृहन्मुंबई महानगरपालिका | कार्यकारी अभियंता |
| 17 | श्री. महेश इंगळे | जिल्हाधिकारी मुंबई | अधिक्षक, भुमापन व भुमि अभिलेख. |
| 18 | श्री. किरण सुरवसे | जिल्हाधिकारी पालघर | तहसीलदार वसई |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | श्री. पवन वि. चांडक | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | तहसीलदार |
| 20 | श्री. अशोककुमार रणखांब | ठाणे महानगरपालिका | अतिरिक्त आयुक्त |
| 21 | श्री. भरत शितोळे | उपविभागीय अधिकारी पनवेल | उपविभागीय अधिकारी, पनवेल |
| 22 | श्री. हिरालाल सोनवणे | अपर आयुक्त, कोकण | अपर आयुक्त, कोकण |
| 23 | श्रीमती. वंदना सुर्यवंशी | निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे | निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे |
| 24 | श्री. प्रशांत कदम | पोलिस अधिक्षक (ग्रामीण) ठाणे | अपर पोलिस अधिक्षक |
| 25 | श्री. आर.एल.ठाकरे | उल्हासनगर महानगरपालिका | शाखा अभियंता |
| 26 | श्री. रविंद्र भोसले | ठाणे पोलिस आयुक्तालय | सहा. पोलिस आयुक्त |
| 27 | श्री. अजीज शेख | वसई विरार महानगरपालिका | उपआयुक्त |
| 28 | डॉ. महेश शिंदीकर | सहाय्यक प्राध्यापक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे. | सहाय्यक प्राध्यापक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे |

सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि सभेला सुरुवात केली.

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | मागील मंजुर इतिवृत्तांमधील प्राप्त तक्रारी अर्ज आणि जनजागृती संदर्भात अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | 1)श्री. अनिकेत सतिश वाडीवकर :-<br>श्री. अनिकेत सतिश वाडीवकर यांची मौजे आगाशी, ता. वसई जि. पालघर येथील सर्वे नं.233, हिस्सा क्र. 1/अ, या जागेतील पाणथळ क्षेत्रावर अतिक्रमणासंदर्भात तक्रार प्राप्त झालेली आहे. याबाबत जिल्हाधिकारी पालघर यांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तसेच तहसीलदार वसई यांचेकडील अधिकारी/कर्मचारी वर्ग, वसई विरार महानगरपालिका, पोलिस अधिकारी/कर्मचारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचे पथकामार्फत पुन्हा जागेची पहाणी करणेसाठी दि. 20/06/17 रोजीची तारीख ठरविण्यात आली होती. दि. 20/06/2017 रोजी निवासी नायब तहसीलदार यांच्याकडील पथक क्र.233/1 या ठिकाणी स्थळपाहणीकामी गेले असता सदर ठिकाणी कायदे व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला असल्याने कार्यवाही करण्यात आलेली नव्हती. सदरची कार्यवाही आवश्यक त्या बंदोबस्तासह दि. 27/06/2017 रोजी ठेवण्यात आलेली आहे असे उपविभागीय अधिकारी यांनी मा. विभागीय आयुक्त यांना सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर, उपायुक्त वसई विरार महानगरपालिका. |
| | | 2) श्री. विवेकानंद गुप्ता :-<br>मुंबई महानगरपालिकेचे संबंधित नोडल ऑफिसर यांना बैठकीत उपस्थित राहणेकरीता मा. आयुक्तांनी सुचना देऊन तातडीने तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या. अहवाल वेळेत सादर न झाल्यास त्याची दखल घेतली जाईल आणि मा. उच्च न्यायालय यांना अकार्यक्षमतेबाबत अहवाल सादर करण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. विभागीय आयुक्त यांनी दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |
| | | 3) श्री. धीरज परब :- तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मीरा भाईंदर महानगरपालिकेचे संबंधित प्रतिनिधी अथवा नोडल ऑफिसर यांना महिती सादर करण्याच्या सुचना दिल्या असता त्या संदर्भात माहिती देण्याकरीता ते उपस्थित नसल्याने मा. विभागीय आयुक्त यांनी पुढील बैठकीमध्ये सविस्तर माहितीसह वेळेत उपस्थित राहण्याच्या संबंधितांना सुचना देण्याबाबत निर्देश दिले. | उपायुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका. |
| | | 4) श्री. कुलदीप चौधरी :-<br>श्री. कुलदीप चौधरी यांची नायगाव (प) ता. वसई जि. | जिल्हाधिकारी पालघर, उपआयुक्त वसई विरार |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पालघर येथील कांदळवनावर भरणी करुन सुमारे 1 एकर क्षेत्रावरील कांदळवने नष्ट केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तलाठी सजा वडवली यांनी आरोपींविरुध्द मणिकपुर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.<br>सदर ठिकाणी झालेला भराव निष्कासित करुन वेटलॅंड जमीन पुर्ववत करणेसाठी वसई विरार महानगरपालिका, पोलीस कर्मचारी, तलाठी मंडळ अधिकारी यांचेसह दि. 20/06/2017 रोजी कार्यवाही करणेत येत आहे असे मा. विभागीय आयुक्तांना सांगण्यात आले. | महानगरपालिका. |
| | | 5) श्री. रोहित जोशी:- रोहीत जोशी ठाणे यांनी स्वामी समर्थ मठ कोपरी ठाणे (पु) येथील कांदळवनावर भरणी करुन कांदळवन नष्ट केल्याबाबत तक्रार केली आहे. सदर तक्रारीबाबत जिल्हाधिकारी ठाणे व उपायुक्त ठाणे महानगरपालिका यांनी उपविभागीय अधिकारी (महसुल), तहसीलदार यांना या तक्रीबाबत दि.23/06/2017 रोजी स्थळपाहणी करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत असे त्यांच्याकडील उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. सदर चौकशीबाबतचा अहवाल लेखी स्वरुपात समितीसमोर सादर करण्याच्या सुचना मा. विभागीय आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे, उपायुक्त ठाणे महानगरपालिका |
| | | 6) श्री. हरीश पांडे :-<br>श्री. हरीश पांडे, मुक्काम दहिसर (प), मुंबई यांनी मढ मार्वे रोड, मार्वे गाव, ता. बोरिवली येथील कांदळवन बृहन्मुंबई महानगरपालिका व INS हमलाच्या अधिकाऱ्यांनी नष्ट केल्याची तक्रार केली होती. सदर प्रकरणाची चौकशी झाली असल्याचे तहसीलदार यांनी सांगितले. सदर चौकशीबाबतचा अहवाल लेखी स्वरुपात समितीसमोर सादर करण्याच्या सुचना मा. विभागीय आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |
| | | 7) श्री. फ्रान्सिस डिसोजा :-<br>श्री फ्रान्सिस डिसोजा, अध्यक्ष हरित नैसर्गिक वैभव बचाव अभियान यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीबाबत जिल्हाधिकारी पालघर व उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांचे प्रतिनिधी यांनी तेथील सर्वे क्र. 220 मधील अनधिकृत बांधकामाबाबत तहसीलदार वसई यांचे नोटीशीचे विरुध्द श्री. ललीत सखाराम म्हात्रे यांनी अतिक्रमण तोडु नये म्हणुन मा. दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर वसई यांचे न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात मा. | जिल्हाधिकारी पालघर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. परंतु स्थगिती उठविणेत यावी यासाठी उपविभागीय अधिकारी वसई यांनी मा. न्यायालयास विनंतीपर पत्र दि. 19/06/2017 दिलेले आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेली स्थगिती उठताच अतिक्रमण निष्कासन करण्याची करणेबाबतची कार्यवाही तातडीने करणेत येईल अशी माहिती उपविभागीय अधिकारी, (वसई) यांनी दिली. | |
| | | 8) श्री. अनंत दत्तात्रय पाटील :- श्री अनंत दत्तात्रय पाटील यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीबाबत जिल्हाधिकारी पालघर व उपायुक्त वसई विरार महानगरपालिका यांचे प्रतिनिधी यांनी तेथील सर्वे क्र. 220 मधील अनधिकृत बांधकामाबाबत अनधिकृत बांधकामाबाबत तहसीलदार वसई यांचे नोटीशीचे विरुध्द श्री. ललीत सखाराम म्हात्रे यांनी अतिक्रमण तोडु नये म्हणुन मा. दिवाणी न्यायालयात वरीष्ठ स्तर वसई यांचे न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यात मा. न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. परंतु स्थगिती उठविणेत यावी यासाठी उपविभागीय अधिकारी वसई यांनी मा. न्यायालयास विनंतीपर पत्र दि. 19/06/2017 दिलेले आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेली स्थगिती उठताच अतिक्रमण निष्कासन करण्याची कार्यवाही तातडीने करणेत येईल असे आश्वासन उपविभागीय अधिकारी वसई विरार महानगरपालिका यांनी मा. विभागीय आयुक्त यांना दिले. | जिल्हाधिकारी पालघर. |
| | | 9) श्री. मॅकेन्झी डाबरे :-<br>श्री. मॅकेन्झी डाबरे यांची मौजे भुईगाव बु.स.नं 220 पै या शासकीय खांजन जमीनीवर श्री. लुक आगोस्तीन लुजबो रा. गिरीज हे 02 ट्रॅक्टर व पोकलँडच्या सहाय्याने अनधिकृत तलाव खोदकाम करीत असलेबाबत तक्रार प्राप्त झालेली असुन तक्रारदार यांनी संबंधित आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच श्री. जगदिश मेहेर व इतर पदाधिकारी यांनी अनधिकृत गौणखनिज उत्खनन करुन त्यालगतच्या तिवरांच्या लहान झाडांना जाळून पर्यावरणाचा ऱ्हास केला म्हणून तलाठी सजा निर्मळ यांनी त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन वसई येथे 27/04/2017 रोजी गुन्हा दाखल केलेला आहे अशी माहिती उपविभागीय अधिकारी, (वसई) यांनी मा. विभागीय आयुक्त यांना दिली. | जिल्हाधिकारी पालघर |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | पाणथळ ऱ्हासा संदर्भात नवीन प्राप्त तक्रारींचा आढावा. | नवीन वेटलँड ऱ्हासासंदर्भात एकुण 9 तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. मा. विभागीय आयुक्तांनी तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन अहवाल पुढील सभेपुर्वी सदस्य सचिव यांना सादर करण्याच्या संबंधित यंत्रणेला सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर, सिंधुदुर्ग, ठाणे, उपआयुक्त मिरा भाईदर महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका. |
| 3 | मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. 230/2001 मध्ये वेटलँड संवर्धन संदर्भात दिलेल्या आदेशाचे पालन करण्याकरीता रुपरेषा ठरविणे. | 2.25 हेक्टर पेक्ष जास्त वेटलँड असतील तर ते निश्चित करुन Brief Document तयार करावे तसेच Brief Document तयार करताना विशेष तज्ञाची नेमणुक करावी व त्या मार्फत Brief Document तयार करण्याची कारवाई करावी असे मा. विभागीय आयुक्त यांनी आदेश दिले. | सर्व जिल्हाधिकारी, सदस्य सचिव. |
| 4 | अध्यक्षांनी बैठकीच्या विषयाव्यतिरिक्त पुढील विषयांवर चर्चा केली. | 1. पाणथळ क्षेत्रामध्ये कचरा प्लॅस्टिक यामुळे पाणी दुषित होत असुन सदर पाणथळ क्षेत्राच्या ठराविक अंतरावर जाळी किंवा इतर पर्यायी साहित्य द्वारे पाणथळामध्ये विशेषत: कांदळवन क्षेत्रामध्ये प्लॅस्टिक कचरा अडविण्याबाबतचा प्रारुप तत्वावर प्रयोग राबविणेकरीता 1 किंवा 2 स्थळ निवड करावीत आणि त्यामध्ये प्रयोग राबविण्यात यावा अशी सुचना मा. अध्यक्षांनी दिले आहे. | मुंबई व नवी मुंबई महानगरपालिका, वनशक्ती अशासकीय संस्था. |
| | | 2. पाणथळाचे संवर्धन व संरक्षणार्थ विविध योजनेमधून अथवा CSR फंडातुन योजना तयार करावी. सदर योजनेच्या माध्यमातुन पाणथळामधील जैवविविधता याचे संवर्धन होण्याकरीता प्रयत्न करावे अशी चर्चा मा. अध्यक्षांनी केली. | जिल्हाधिकारी सर्व. |

सदर सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडुन जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष,

कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती

तथा

विभागीय आयुक्त, कोकण विभाग.